# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक :
०२०- २५६९१२३३
२५६०१२५७
२५६०१२५८
२५६०१२५९

शैक्षणिक विभाग
गणेशखिंड, पुणे-४११००७
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
फॅक्स : ०२०-२५६९१२३३
वेबसाइट : www.unipune.ac.in
इ-मेल: approval@unipune.ac.in

संदर्भ क्र. : CA/8719

दिनांक : 24/12/2014

मा. प्राचार्य/संचालक
पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील
सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था

विषय : महाविद्यालयाचे फायर ऑडिट बाबत...

महोदय/महोदया,

सोबत मुख्य अग्निशमन अधिकारी, पुणे महानगरपालिका, पुणे यांचे मा. कुलगुरू यांना अग्रेषित केलेल्या पत्राची प्रत जोडली आहे. पत्रातील आशय स्वयंस्पष्ट असून त्यानुसार कार्यवाही करावी ही विनंती.

कळावे,

उपकुलसचिव
(शैक्षणिक विभाग)

सोबत : वरीलप्रमाणे.

पुणे महानगरपालिका
शिवाजीनगर, पुणे ५.
मुख्य अग्निशामक अधिकारी यांचे कार्यालय,
सेंट्रल फायर स्टेशन, जा. क्र.अशाद/२५५४
महात्मा फुले पेठ, दिनांक : १२११२११४

15854

12 DEC 2014

6806
13/12/14

प्रति,
मा. कुलगुरू,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
गणेशखिंड रोड, पुणे.

मा. कुलसचिव यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे-७.
आवक क्र.-आर/3326
दिनांक- 13/12/14
आवक दिनांक- 15/12/14
विभाग-

विषय : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि अंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयांचे फायर ऑडीटबाबत.

महोदय,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आवारात येणाऱ्या सर्व विद्यार्थी, कर्मचारी व इतर नागरीकांच्या अग्निसुरक्षेच्या दृष्टीने विद्यापीठाच्या आवारात असणाऱ्या सर्व इमारतींमध्ये आवश्यक त्या आग प्रतिबंधक उपाययोजना करणे आवश्यक आहे. आपल्या वतीने अशा प्रकारच्या काही उपाययोजना केलेल्या असतील तर त्यांची तपासणी करणे, त्या योग्य पद्धतीने कार्यान्वित आहेत किंवा कसे ? याची खात्री करणे व कार्यान्वित नसल्यास त्या कार्यान्वित करून घेऊन त्याबाबतचा अहवाल अग्निशमन दलाकडे सादर करणे आवश्यक आहे. मे. राज्य शासनाने दि.०६/१२/२००८ पासून लागू केलेल्या महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षण उपाययोजना अधिनियम २००६ व नियम २००९ या कायद्यानुसार या बाबी आवश्यक आहेत.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व महाविद्यालयांनाही उपरोक्त कायद्यानुसार त्यांचे इमारतींसाठीचे आग प्रतिबंधक दृष्टीने फायर ऑडीट करून घेणे आवश्यक आहे. ज्या महाविद्यालयांच्या इमारती नव्याने उभारण्यात येत आहेत अशा इमारतींना संबंधीत महाविद्यालयांच्या मागणीनुसार अग्निशमन दलाच्या वतीने ना हरकत दाखले देण्याची प्रक्रीया केली जाते. मात्र ज्या महाविद्यालयांच्या इमारती जुन्या आहेत अशा इमारतींमध्ये आवश्यक त्या आग प्रतिबंधक उपाययोजना करणे, केलेल्या उपाययोजनांची उपरोक्त कायद्यानुसार पुणे महानगरपालिकेने नेमणूक केलेल्या लायसन्सप्राप्त अभिकरणांचेकडून तपासणी करून फायर ऑडीट करून घेणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे आपल्या वतीने विद्यापीठाच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व महाविद्यालयांना याबाबत कळवून त्याप्रमाणे कार्यवाही करणेबाबतचे निर्देश द्यावेत.

वरीलप्रमाणे आपल्या विद्यापीठाच्या इमारतींमध्ये तसेच अंतर्गत येणाऱ्या सर्व महाविद्यालयांमध्ये आग प्रतिबंधक दृष्टीने उपाययोजना केल्यानंतर सदर महाविद्यालयाने तसा अहवाल पुणे अग्निशमन दलाकडे केल्यास आत्यंतिक प्रसंगी सदरच्या उपाययोजनांचा वापर करून प्राथमिक स्वरूपातील आगी त्वरीत विझविण्याबाबतचे जरूर ते प्रशिक्षण अग्निशमन दलाच्या वतीने तेथील सर्व कर्मचाऱ्यांना देण्याबाबतचे योग्य ते सहकार्य करण्यात येईल.

तरी कृपया याबाबत आपणांकडून संबंधीतांना योग्य ते आदेश व्हावेत ही विनंती.

मा.स.कळावे.

११।१२

( प्रशांत दा. रणपिसे )
मुख्य अग्निशमन अधिकारी
पुणे महानगरपालिका